वाचले :- १) या कार्यालयाकडील आरटीएस अपिल क्र. १४८/१५ मधील दिनांक ०७/०१/२०१७ रोजीचा आदेश.

२) दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे कलम १५२ प्रमाणे दुरुस्ती आदेश.

आरटीएस/अपिल/क्र.१४८/१५ / 800

दुरुस्ती आदेश :-

उपोद्घातातील क्र. १ अन्वये आरटीएस अपिल क्र. १४८/१५ मध्ये दिनांक ०७/०१/२०१७ रोजी आदेश पारीत झालेले असुन, सदर आदेशाऐवजी खालीलप्रमाणे आदेश वाचण्यात यावे.

| | |
|---|---|
| १) श्री. केशव सोंग्या म्हात्रे (मयत)<br>१.१) श्रीम. सरशीबाई म्हात्रे<br>रा. पडले गाव, ता. जि. ठाणे<br>१.२) श्रीम. मोनिका किर्तीनंदन काळण<br>रा. एडुसा, ता. कल्याण, जि. ठाणे<br>१.३) श्रीम. निलम गुरुनाथ म्हात्रे<br>रा. वडवली गाव, ता. कल्याण, जि. ठाणे | १.४) श्री. किसन केशव म्हात्रे<br>रा. मु.पो. पडले गाव, ता. जि. ठाणे<br>२) श्री. बाळाराम सोंग्या म्हात्रे<br>३) श्रीम. सिताबाई कर्सा पाटील<br>४) प्रभा विश्वास माळी<br>५) श्री. मनिषा चंद्रकांत आंबोरे<br>सर्व रा. मौजे- डावले, ता. जि. ठाणे<br>...अपिलार्थी |
| **विरुध्द** | |
| १) जमनाबाई नेहरु म्हात्रे मयत तर्फे वारस<br>१.१) श्रीम. लताबाई नामदेव पाटील<br>१.२) श्री. सुरेश नेहरु म्हात्रे<br>१.३) श्रीम. सतीश नेहरु म्हात्रे<br>१.४) श्री. अस्मुक नेहरु म्हात्रे<br>१.५) श्री. लक्ष्मण नेहरु म्हात्रे<br>१.६) श्रीम. हौसाबाई गुलाब म्हात्रे | १.७) श्रीम. संगिता शशिकांत म्हात्रे<br>पत्ता : मौजे- डावले, ता. जि. ठाणे<br>...सामनेवाले<br>२) मेसर्स मातेश्वरी रियलटर्स तर्फे भागीदार<br>२.१ ) श्री. हिरालाल शामजी रंगानी<br>२.२) श्री. शैलेश नारायणभाई भानुशाली<br>पत्ता : मातेश्वरी अलदुरा, कल्याण-शिळ रोड, खिडकाळी ता. जि. ठाणे<br>...सामान्यपक्षकार |

**दावा मिळकत**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|
| मौजे- खिडकाळी ता.जि.ठाणे | १४५/२ ड | ०-२९-३ | ६-०० | १२४१ व १३१६ |
| | १४४/२ ब | ०-३६-९ | ७-१३ | |
| | ११६/४ | ०-३४-७ | १.३१ | |
| | १०२/२ ड | ०-२८-३ | ०-८१ | |

**<u>अपिल वस्तुस्थिती</u> :-**

अपिलार्थी यांनी मौजे खिडकाळी, ता.जि.ठाणे येथील उपरोक्त नमुद स.नं. च्या जमिनीबाबत नायब तहसिलदार (महसुल) ठाणे यांनी प्रकरण क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ दि.२६/०१२/२०१४ रोजी दिलेला निर्णय व त्याअनुषंगाने नोंदविण्यात आलेला फेरफार क्र.१२४१ व १३१६ चे विरुध्द प्रस्तुतचे अपिल या न्यायालयात दाखल केले होते. सदर अपिलामध्ये दिनांक ०७/०१/२०१७ रोजी आदेश पारीत करण्यात आला आहे.

सदर अपिलामध्ये आदेश पारीत करताना आदेशामध्ये " अ.क्र. १ मध्ये अपिलार्थी यांचे अपिल फेटाळण्यात येत आहे " असे चुकीने टंकलिखित करण्यात आले आहे. तरी यापुढे सदर आदेशामध्ये " अ.क्र. १ मध्ये अपिलार्थी यांचे अपिल अंशत: मान्य करण्यात येत आहे असे वाचावे. "

दिनांक- २३/०१/२०१७
स्थळ - ठाणे

सही/-
(सुदाम परदेशी)
उपविभागीय अधिकारी
ठाणे विभाग, ठाणे

प्रत :- श्रीम. सरशीबाई म्हात्रे व इतर ०७ अपिलार्थी यांचेकडे माहितीसाठी
प्रत :- श्रीम. लताबाई नामदेव पाटील व इतर ०८ सामनेवाले यांचेकडे माहितीसाठी
प्रत :- तहसिलदार ठाणे यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- मंडळ अधिकारी दहिसर/तलाठी साझा देसाई यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

SUB-DIVISIONAL OFFICER THANE DIVISION, THANE

(सुदाम परदेशी)
उपविभागीय अधिकारी
ठाणे विभाग, ठाणे

क्रमांक आरटीएस/अपिल-१४८/१५
उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय ठाणे.
दिनांक : ०७/ ०३/२०१७

**प्रति,**

| | |
|---|---|
| १) श्री. केशव सोंग्या म्हात्रे (मयत)<br>१.१) श्रीम. सरशीबाई म्हात्रे<br>रा. पडले गाव, ता. जि. ठाणे<br>१.२) श्रीम. मोनिका किर्तीनंदन काळण<br>रा. एडुसा, ता. कल्याण, जि. ठाणे<br>१.३) श्रीम. निलम गुरुनाथ म्हात्रे<br>रा. कडवली गाव, ता. कल्याण, जि. ठाणे | १.४) श्री. किसन केशव म्हात्रे<br>रा. मु.पो. पडले गाव, ता. जि. ठाणे<br>२) श्री. बाळाराम सोंग्या म्हात्रे<br>३) श्रीम. सिताबाई कसा पाटील<br>४) प्रभा विश्वास माळी<br>५) श्री. मनिषा चंद्रकांत आंबोरे<br>सर्व रा. मौजे- डावले, ता. जि. ठाणे<br>...**अपिलार्थी** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) जमनाबाई नेहरु म्हात्रे मयत तर्फे वारस<br>१.१) श्रीम. लताबाई नामदेव पाटील<br>१.२) श्री. सुरेश नेहरु म्हात्रे<br>१.३) श्रीम. सतीश नेहरु म्हात्रे<br>१.४) श्री. अस्मुक नेहरु म्हात्रे<br>१.५) श्री. लक्ष्मण नेहरु म्हात्रे<br>१.६) श्रीम. हौसाबाई गुलाब म्हात्रे<br>१.७) श्रीम. संगिता शशिकांत म्हात्रे<br>पत्ता : मौजे- डावले, ता. जि. ठाणे<br>...**सामनेवाले** | २) मेसर्स मातेश्वरी रियलटर्स तर्फे भागीदार<br>२.१) श्री. हिरालाल शामजी रंगानी<br>२.२) श्री. शैलेश नारायणभाई भानुशाली<br>पत्ता : मातेश्वरी अलदुरा, कल्याण-शिळ रोड,<br>खिडकाळी ता. जि. ठाणे<br>...**सामान्यपक्षकार** |

**महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये न्यायनिर्णय**
**दावा मिळकत जमिन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|
| मौजे- खिडकाळी ता.जि.ठाणे | १४५/२ ड | ०-२९-३ | ६-०० | १२४१ व १३१६ |
| | १४४/२ ब | ०-३६-९ | ७-१३ | |
| | ११६/४ | ०-३४-७ | १.३१ | |
| | १०२/२ ड | ०-२८-३ | ०-८१ | |

वादी यांनी वरील दावा मिळकतीबाबत या न्यायालयात दाखल केलेले आरटीएस अपिल क्र. १४८/१५ मध्ये दिनांक ०८/०१/२०१७ रोजी खालील प्रमाणे निर्णय देण्यात आलेला आहे.

**आदेश-**

१. अपिलार्थी यांचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

२. नायब तहसिलदार(महसुल) ठाणे यांनी प्रकरण क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ दि.२६/०१२/२०१४ रोजीचा निर्णय रद्द करण्यात येत आहे.

३. फेरफार नोंद क्र.१२४१ व १३२५ रद्द करण्यात येत आहे.

४. निर्णय सर्व संबंधितांना कळवावा.

५. खर्चाबाबत आदेश नाहीत.

दिनांक- ०५/०१/२०१७

स्थळ - ठाणे

**उपविभागीय अधिकारी**
**ठाणे विभाग, ठाणे**

प्रत :- श्रीम. सरशीबाई म्हात्रे व इतर ०७ अपिलार्थी यांचेकडे माहितीसाठी

प्रत :- श्रीम. लताबाई नामदेव पाटील व इतर ०८ सामनेवाले यांचेकडे माहितीसाठी

प्रत :- तहसिलदार ठाणे यांचेकडे माहितीसाठी

उपविभागीय अधिकारी ठाणे विभाग, ठाणे यांचे न्यायालयात.

आरटीएस/अपिल/क्र.१४८/१५

| | |
|---|---|
| १) श्री. केशव सोंग्या म्हात्रे (मयत)<br>१.१) श्रीम. सरशीबाई म्हात्रे<br>रा. पडले गाव, ता. जि. ठाणे<br>१.२) श्रीम. मोनिका किर्तीनंदन काळण<br>रा. एडुसा, ता. कल्याण, जि. ठाणे<br>१.३) श्रीम. निलम गुरुनाथ म्हात्रे<br>रा. वडवली गाव, ता. कल्याण, जि. ठाणे | १.४) श्री. किसन केशव म्हात्रे<br>रा. मु.पो. पडले गाव, ता. जि. ठाणे<br>२) श्री. बाळाराम सोंग्या म्हात्रे<br>३) श्रीम. सिताबाई कर्सा पाटील<br>४) प्रभा विश्वास माळी<br>५) श्री. मनिषा चंद्रकांत आंबोरे<br>सर्व रा. मौजे- डावले, ता. जि. ठाणे<br>...अपिलार्थी |
| विरुध्द | |
| १) जमनाबाई नेहरु म्हात्रे मयत तर्फे वारस<br>१.१) श्रीम. लताबाई नामदेव पाटील<br>१.२) श्री. सुरेश नेहरु म्हात्रे<br>१.३) श्रीम. सतीश नेहरु म्हात्रे<br>१.४) श्री. अस्मुक नेहरु म्हात्रे<br>१.५) श्री. लक्ष्मण नेहरु म्हात्रे<br>१.६) श्रीम. हौसाबाई गुलाब म्हात्रे<br>१.७) श्रीम. संगिता शशिकांत म्हात्रे<br>पत्ता : मौजे- डावले, ता. जि. ठाणे<br>...सामनेवाले | २) मेसर्स मातेश्वरी रियलटर्स तर्फे भागीदार<br>२.१) श्री. हिरालाल शामजी रंगानी<br>२.२) श्री. शैलेश नारायणभाई भानुशाली<br>पत्ता : मातेश्वरी अलदुरा, कल्याण-शिळ रोड, खिडकाळी ता. जि. ठाणे<br>...सामान्यपक्षकार |

SUB-DIVISIONAL OFFICER, THANE DIVISION, THANE

**महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये न्यायनिर्णय**

**दावा मिळकत जमिन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|
| मौजे- खिडकाळी ता.जि.ठाणे | १४५/२ ड | ०-२९-३ | ६-०० | १२४१ व १३१६ |
| | १४४/२ ब | ०-३६-९ | ७-१३ | |
| | ११६/४ | ०-३४-७ | १.३१ | |
| | १०२/२ ड | ०-२८-३ | ०-८१ | |

**१. अपिल वस्तुस्थिती :-**

१.१ अपिलार्थी यांनी मौजे खिडकाळी, ता.जि.ठाणे येथील उपरोक्त नमुद स.नं. च्या जमिनीबाबत नायब तहसिलदार(महसुल) ठाणे यांनी प्रकरण क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ दि.२६/०१२/२०१४ रोजी दिलेला निर्णय व त्याअनुषंगाने नोंदविण्यात आलेला फेरफार क्र.१२४१ व १३१६ चे विरुध्द प्रस्तुतचे अपिल या न्यायालयात दाखल केले आहे.

१.२ प्रस्तुत अपिलाबाबत अपिलार्थी व सामनेवाले यांना सुनावणीच्या नोटीसा काढण्यांत येवून प्रथम सुनावणी दिनांक २३/११/२०१५ रोजी घेण्यांत आली. तद्नंतर दि.१८/१२/२०१५, ११/०१/२०१६, ०१/०२/२०१६, १५/०२/२०१६, ०४/०३/२०१६, २१/०३/२०१६, ०१/०४/२०१६, २९/०४/२०१६, १०/०६/२०१६, ०१/०७/२०१६, २९/०७/२०१६, ०५/०८/२०१६, १९/०८/२०१६, ०९/०९/२०१६, २६/०९/२०१६, ७/१०/२०१६, २१/१०/२०१६, ०४/११/२०१६, २५/११/२०१६, ०९/१२/२०१६, १९/१२/२०१६ रोजी सुनावणी घेण्यांत आली. सदर अपिल दिनांक २३/१२/२०१६ रोजी अपिलाची सुनावणी निर्णय घेणेकामी बंद करण्यांत आली.

१.३ उपरोक्त अपिला संदर्भात दोन्ही पक्षकारांना वेळोवेळी सुनावणीची संधी देणेत आली. उपरोक्त अपिलामध्ये अपिलार्थी क्र.१.१ ते १.४ यांचे वतीने विधीतज्ञ श्री. किरण शिंदे व अपिलार्थी क्र २ ते ५ श्री. आर.पी.मुधोळकर तसेच सामनेवाले यांचे वतीने विधीतज्ञ श्री. मयुर काते. यांनी कामकाज पाहिले.

## २. <u>अपिलार्थी यांनी त्यांच्या लेखी युक्तीवादामध्ये दिलेल्या मुद्यांचा सारांश</u> :-

२.१ दावा मिळकतीचे मुळ मालक सुदाम बापु ठाकुर हे होते. त्याचे निधनानंतर दावा मिळकतीस फेरफार नोंद क्र.५४० अन्वये त्यांची आई मोतीबाई बापु ठाकुर यांच्या नावाची नोंद करण्यात आली. बापु ठाकुर यांना मोतीबाई ही प्रथम पत्नी व सखुबाई हि द्वितीय पत्नी होती. दि.०९/०६/१९६० रोजी मोतीबाई व सखुबाई यांनी कानुबाई हिस दावा मिळकत व इतर मिळकती बक्षीसपत्राने दिल्या. कानुबाई म्हात्रे यांचे निधन सन १९७३ साली झाले. त्यांच्या निधनानंतर फेरफार क्र.६६० दि.२४/०१/१९८४ अन्वये अपिलार्थी यांचे नावाची नोंद करण्यात आली. सदर फेरफारास सामनेवाले यांनी कधीही हरकत घेतलेली नाही.

२.२ अशी परिस्थिती असताना तलाठी यांनी जमनाबाई यांचे वारस सामनेवाले क्र.१.१ ते १.७ यांचे नावाची नोंद फेरफार नोंद क्र.१२४१ व १३१६ अन्वये बेकायदेशिरपणे केली आहे. दावा मिळकतीबाबत अपिलार्थी यांचे लाभात मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील आदेश क्र.महसूल/१क्र./टे-१/एक.ए.पी./एस.तु.आर./१३८/२०१० दि.२३/०३/२०१० रोजी बिनशेती आदेश पारित करण्यता आले आहेत.

२.३ फेरफार नोंद क्र. १२४१ व १३१६ नोंदवितांना अपिलार्थी यांना कोणत्याही प्रकारची नोटीस देण्यात आली नाही.

**अपिलार्थी यांच्या युक्तीवादातील महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे.**

२.४ सामनेवाले यांनी दिलेले लेखी म्हणणे हे चुकीचे व बेकायदेशिर असून अपिलार्थी यांना मान्य व कबुल नाही. अपिलार्थी यांनी फेरफार क्र.१२४१ व १३१६ हे चुकीचे व बेकायदेशिर असल्याने रद्द करण्यात यावे, म्हणून प्रस्तुत अपिल या न्यायालयात दाखल केले आहे.

२.५ सामनेवाले यांनी सन १९६० सालचे नोंदणीकृत बक्षीसपत्रास हरकत उपस्थित केली आहे. सदरचे बक्षीसपत्र सामनेवाले यांनी सुमारे ५३ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीने दिवाणी दावा क्र.६०४/२०१३ अन्वये सन २०१३ साली आव्हानित केला आहे. सदरचे बक्षिपत्र कानुबाई म्हात्रे अपिलार्थी यांचे पुर्वगामी कानुबाई म्हात्रे यांचे लाभात नोंदविण्यात आले होते. त्या संदर्भात सामनेवाले यांनी प्रथम दिवाणी न्यायालयामध्ये दावा दाखल केला व फेरफाराबाबत अपिल

दाखल केले आहेत. त्यामुळे महसूल न्यायालयाने सामनेवाले यांची मागणी फेटाळणे आवश्यक आहे. दिवाणी न्यायालयामध्ये अपिल चालु असल्याने त्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार महसूल न्यायालयास नाही, ही बाब फेरफार नोंदवताना विचारात घेतलेली नाही.

या सर्व बाबी पहाता, फेरफार क्र.१२४१ व १३१६ रद्द करण्यात यावे, अशी विनंती अपिलार्थी यांनी केली आहे.

**३. सामनेवाले क्र.१.१ ते १.८ यांनी अपिलात नमुद केलेल्या लेखी मुद्यांचा सारांश खालीलप्रमाणे :-**

३.१ अपिलार्थी यांनी फेरफार क्र.१२४१ व १३१६ च्या मंजुरीविरुध्द सदरचे अपिल दाखल केलेले आहे. सदरचे अपिल खोटे व कायदेशिर नाही तसेच सामनेवाले यांना मान्य व कबुल नाही. दावा मिळकतीचे मालक अपिलार्थी व सामनेवाले क्र.१.१ ते १.८ यांचे पुर्वगामी हक्कदार श्री.बापु ठाकुर हे होते.

३.२ सामनेवाले क्र.१.१ ते १.८ यांचे असे म्हणणे आहे की, श्री.बापु ठाकुर म्हात्रे हे मयत झालेले असुन त्यांस मोतीबाई व सखुबाई या दोन पत्नी होत्या. बापु ठाकुर व मोतीबाई यांचे लग्न संबंधातुन सुदाम बापु म्हात्रे हे अपत्य झालेले असुन बापु ठाकुर म्हात्रे व सखुबाई यांचे लग्न संबंधातुन श्रीमती कानुबाई व जमुनाबाई हे दोन अपत्य झालेले आहेत. सुदाम बापु हे मयत झालेले असुन त्यांस मुलगा मुलगी वारस नसुन मोतीबाई, सखुबाई, कानुबाई व जमुनाबाई हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. कानुबाई सोंग्या म्हात्रे हया मयत झालेल्या असुन अपिलार्थी हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत. जमनाबाई नेहरु म्हात्रे हया मयत झालेल्या असुन त्यांस श्री.सुरेश, श्री. सतिश, श्री. विनायक, श्री. आस्मुक, श्री. लक्ष्मण, लताबाई नामदेव पाटील, हौसाबाई शशिकांत पाटील हे कायदेशिर वासर आहेत. कानुबाई सोंग्या म्हात्रे हया मयत झालेल्यानंतर त्यांचे वारस म्हणुन अपिलार्थी यांचे नावाची नोंद दाखल झालेली आहे. परंतु जमनाबाई नेहरु म्हात्रे या मयत झाल्यानंतर त्यांचे वारसांची नोंद दाखल झालेली नव्हती.

३.३ सबब सदर मिळकतीस जमनाबाई नेहरु म्हात्रे यांचे वारस म्हणुन ७/१२ सदरी नाव दाखल होणेसाठी सामनेवाले क्र.१.१ ते १.८ यांनी अर्ज दाखल केल्यानंतर फेरफार क्र.१२४१ हा नोंदविण्यात आला आहे. सदर फेरफार क्र.१२४१ च्या मंजुरीस हरकत घेण्याचा कोणताही कायदेशिर अधिकार अपिलार्थी यांस नसताना त्यांनी सदर मंजुरीस हरकत घेतलेली होती.

३.४ मौजे-खिडकाळी, ता.जि.ठाणे येथील फेरफार क्र.१२४१ दि.०५/०४/२०१३ रोजीच्या च्या मंजुरीबाबत अपिलार्थी यांनी सदर फेरफार नोंदीस हरकत घेतल्यानंतर तलाठी सजा देसाई यांनी हरकत घेतलेल्या नोंदीबाबत विवादग्रस्त नोंदवही गाव नमुना नं.६अ अन्वये भरुन ते मा.नायब तहसिलदार (महसुल) ठाणे यांचे न्यायालयात चौकशीसाठी पाठविण्यात आलेले होते. मा. नायब तहसिलदार(महसुल) ठाणे यांनी प्रकरण क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ कामी संबंधित पक्षकार यांस नोटीस पाठविण्यात आल्या होत्या. सदर नोटीस अपिलार्थी यांस पोहच झाल्यानंतर अपिलार्थी तर्फे हेमांगी भोई यांनी दि.०९/१०/२०१३ रोजी मा.न्यायालयात वकिलपत्र सादर केले. अपिलार्थी यांस त्यांचे वकिलामार्फत वकिल भोईर यांना प्रकरणी लेखी म्हणणे सादर करण्याच्या सुचना दि.०४/१२/२०१३ रोजी समक्ष न्यायालयात उपस्थित असताना देण्यात आले होते. तसेच लेखी म्हणणे सादर करणेकरिता आठ दिवसांच

मुदत ही देण्यात आली होती. परंतु अपिलार्थी यांनी प्रकरणी त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले नाही.

३.५ दि.२४/१२/२०१३ रोजी हया दिवसापासुन आठ दिवसांची लेखी म्हणणे सादर करण्याची मुदत देण्यात आली व प्रकरण दोन्ही पक्षकारांच्या संमतीने बंद करण्यात आले. मा.नायब क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ कामी दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन करुन दि.२६/१२/२०१४ रोजी निकाल देवुन मौजे- खिडकाळी येथील सदर मिळकतीचे भोगवटदार सदरी असलेली नावे तशीच ठेवुन कै. जमनाबाई बापु ठाकुर उर्फ जमनाबाई नेहरु म्हात्रे यांचे वारसांची नोंद गावदप्तरी होणेकामी फेरफार क्र.१२४१ मंजुर करण्याचा हुकुम पारीत केला आहे. सदरचा निकाल योग्य व कायदेशिर आहे. सबब त्याप्रमाणे सदर मिळकतीस वारसाने जमनाबाई बापु ठाकुर उर्फ जमनाबाई नेहरु म्हात्रे यांचे नावाची नोंद दाखल झालेली आहे.त्यांचे निधन झालेले असल्यामुळे त्यांचे वारस म्हणुन सामनेवाले क्र.१.१ ते १.८ यांच्या नावाची वारस नोंद फेरफार क्र.१३१६ अन्वये दाखल झालेली आहे. सबब सदर मिळकतीचे कायदेशिर मालक हे सामनेवाले क्र. १.१ ते १.८हे झालेले आहेत.

३.६ श्री. बापु ठाकुर म्हात्रे यांची जमनाबाई बापु ठाकुर उर्फ जमनाबाई नेहरु म्हात्रे ही मुलगी आहे हे अपिलार्थी यांनी मान्य केलेले आहे. त्यांचा वारसा हक्काने कायदेशिर अधिकारी आहे.

३.७ सदर मिळकत ही अपिलार्थी व सामनेवाले क्र.१.१ ते १.८ यांचे मालकी हक्काची असुन सदर मिळकतीत सामनेवाले क्र.१.१ ते १.८ यांचा अविभाज्य असा कायदेशिर अधिकार आहे. तसेच ती यांचे ताब्यात व कब्जेवहीवाटीत मालकी हक्काने बापु ठाकुर यांचेकडून आलेली आहे. सदर मिळकतीबाबत आजपर्यंत कोणत्याहीप्रकारची वाटणी अपिलार्थी व समानेवाले क्र.१.१ ते १.८ यांचेमध्ये झालेली नाही. सदर मिळकतीबाबत सामनेवाले व त्यांचे पुर्वगामी हक्कदार जमनाबाई बापु ठाकुर उर्फ जमनाबाई नेहरु म्हात्रे यांनी कोणाच्या ही लाभात कोणत्याही प्रकारचा नोंदणीकृत दस्तऐवज करुन दिलेला नाही.

३.८ स.नं.२०/१ या मिळकतीस वारसा हक्काने अपिलार्थी व समानेवाले क्र.१.१ ते १.८ यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.१९०० अन्वये दाखल झालेली आहे व त्याबाबत अपिलार्थी यांनी ही मिळकत वारसा हक्कानी अपिलार्थी व समानेवाले क्र.१.१ ते १.८ यांचेकडे आलेली आहे असा अर्ज मा.तहसिलदार, ठाणे यांचेकडे दाखल केलेला आहे.

३.९ मा.नायब तहसिलदार(महसूल) ठाणे यांनी प्रकरण क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ कामी चौकशी करताना अपिलार्थी यांस पुरेशी संधी दिलेली आहे. परंतु अपिलार्थी हे फेरफार क्र.१२४१ मंजुर करताना कोणत्याही प्रकारची नोटीस देण्यात आलेली नाही असे चुकीचे विधान करित आहे. सदर प्रकरणी अपिलार्थी व त्यांचे वकिल हजर झालेले आहेत व प्रकरणी त्यांची बाजु मांडण्याकरिता त्यांस पुरेशी मुदत ही दिलेली आहे, असे असताना त्यांस प्रकरणी फेरफार क्र.१२४१ च्या मंजुरीकामी नोटीस देण्यात आलेली नाही. हे म्हणणे चुकीचे आहे. सबब फेरफार क्र.१२४१ हा महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीचे पालन करुन मंजुर करण्यात आलेले आहे. फेरफार क्र.१२४१ च्या मंजुरीनुसार फेरफार क्र.१३१६ हा मंजुर झालेला आहे.

३.१० मा. तत्सम चौकशी अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मौजे-खिडकाळी, ता.ठाणे येथील फेरफार क्र.१२४१ व फेरफार क्र.१३१६ च्या मंजुरीचे हुकुम पारीत केलेले आहे. तो

वस्तुस्थितीचे व उपस्थित होणारे कायदेबाबत जरुर ते मुद्दे उपस्थित करुन दिलेला आहे. सदरचा हुकुम हा कायदयाचा समतोलपणा व नैसर्गिक न्यायाची तत्वे यांचेशी सुसंगत आहे. सदरचा हुकुम प्रकरणी योग्य चौकशी व कारवाई करुन दिला असल्याने तो कायम ठरविणे जरुरीचे आहे. सदर कायदेशिर बाबींचा विचार करुन अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपिल हे फेटाळण्यात यावे, अशी विनंती सामनेवाले यांनी केली आहे.

**४.सामनेवाले क्र.२ यांनी अपिलात नमुद केलेल्या लेखी मुद्यांचा सारांश खालीलप्रमाणे :-**

४.१ दावा मिळकतीचे मुळ मालक सुदाम बापु ठाकुर हे होते. त्यानंतर मोतीबाई बापु ठाकुर व सखुबाई बापु ठाकुर यांनी सदर मिळकत ही नोंदणीकृत बक्षीस पत्राने दि.०९/०६/१९६० रोजी कानुबाई सोंग्या म्हात्रे यांचे लाभात करुन दिले आहे. ते कायदेशिर मालक झाले आहेत. त्यांच्या निधनानंतर त्यांचे वारस म्हणून श्री. केशव सोग्या म्हात्रे व इतर यांचे नावाची नोंद फेरफार क्र.६६० अन्वये यांचे नावाची नोंद करण्यात आली.

४.२ श्री. केशव सोग्या म्हात्रे व इतर यांनी सदर मिळकत ही मे. लक्ष्मी असोसिएट्स यांस दि.०४/०७/२००८ रोजीच्या दस्तऐवज क्र.टनन-२-६०३६/२००८ अन्वये नोंदणीकृत विकास करारनाम्याने दिलेली आहे. सदर करारनाम्याच्या अनुषंगाने फेरफार क्र.१०९९ हा दि.२४/०४/२००९ रोजी मंडळ अधिकारी दहिसर यांनी मंजुर केलेला आहे.

४.३ श्री. केशव सोग्या म्हात्रे व इतर व मे. लक्ष्मी असोसिएट्स यांनी सदर मिळकत ही मे. मातेश्वरी रिअलेटर्स भागीदारी संस्था यांस दि.२५/११/२००९ रोजीच्या दस्तऐवज क्र.टनन-२-११९३५/२००९ अन्वये नोंदणीकृत विकास व करारनाम्याने दिलेली आहे. सदरचा करारनामा आजपर्यंत कोणीही कोणत्याही सक्षम न्यायालाच्या आदेशाने रद्दबातल करुन घेतलेले नाही. मे. लक्ष्मी असोसिएट्स यांनी सदर मिळकत मे. मातेश्वरी रिअलेटर्स भागीदारी संस्था यांस दि.०३/०५/२०१० रोजीच्या दस्तऐवज क्र.टनन-२-५७३९/२०१० अन्वये नोंदणीकृत रिसेल करारनाम्याने दिलेली आहे व त्यानुसार फेरफार क्र.११६० हा मंजुर केलेला आहे.

४.४ श्री. केशव सोग्या म्हात्रे व इतर यांचेबरोबर मे. मातेश्वरी रिअलेटर्स भागीदारी संस्था यांनी दि. २७/०९/२०१० रोजीचा दस्तऐवज क्र.टनन-२-१११८२/२०१० अन्वये पुरवणी करारनामा केलेला आहे. श्री. बाळाराम सोंग्या म्हात्रे यांचेबरोबर मे. मातेश्वरी रिअलेटर्स भागीदारी संस्था यांनी दि.३१/०५/२०१३ रोजीचा दस्तऐवज क्र.टनन-९-४२६०/२०१३ अन्वये पुरवणी करारनामा केलेला आहे. मे. लक्ष्मी असोसिएट्स यांचे लाभांत केशव सोंग्या म्हात्रे व इतर यांनी दि.२५/११/२००९ रोजी दस्तऐवज क्र.५९८/२००९, दस्तऐवज क्र.५९९/२००९ व दि.०३/०५/२०१० रोजी, दस्तऐवज क्र.३४२/२०१० अन्वये कुलमुखत्यारपत्र करुन दिलेले आहे. मे. लक्ष्मी असोसिएट्स यांचे लाभात मनिषा चंद्रकांत अंबोरे यांनी दि.२५/११/२००९ रोजी दस्तऐवज क्र.५९७/२००९ अन्वये कुलमुखत्यारपत्र करुन दिलेले आहे.

४.५ सदर मिळकतीबाबत मा.ठाणे महानगरपालिका ठाणे यांचे कडुन व्ही.पी.नं.एस.११/००११/०९ टिएमसी/टीडीडी ०७०७/१२ दि.०५/११/२०१२ व व्ही.पी.नं.एस.११/००११/०९ टिएमसी/टीडीडी/ १४९३/१५ दि.०७/०९/२०१५ रोजी मे. मोतेश्वरी रिअलेटर्स भागीदारी संस्था यांचे नावे सी.सी. देण्यात आलेली आहे.

४.६ मा.जिल्हाधिकारी ठाणे यांनी क्र.महसुल/क-१/टे-१/एनएपी/एसआर-१३८/२००९ दि.२३/०३/१० रोजी बिनशेती परवानगी दिलेली असून ती रद्द करुन घेतलेली नाही.

४.७ सदर मिळकत ही अपिलार्थी यांचे ताब्यात असताना जमनाबाई नेहरु म्हात्रे यांचा कोणताही संबंध नसताना बापु ठाकुर उर्फ जमनाबाई नेहरु म्हात्रे यांचा कोणताही संबंध नसताना बापु बाळा ठाकुर हे दि.०१/०६/१९४० रोजी मयत झाले असुन त्यांचे वारस नोंद गावी फेरफार क्र.१७४ ने करण्यात आली आहे. परंतु चुकीचे त्यांचे नांव वारस म्हणून दाखल झाले नसुन त्यांना कायदेशिर १. सखुबाई बापु ठाकुर २. मोतीबाई बापु ठाकुर ३. सुदाम बापु ठाकुर ४. काळुबाई सोंग्या म्हात्रे ५. जमनाबाई नेहरु म्हात्रे वारसांची नावाची नोंद फेरफार क्र.६६० व फेरफार क्र.८८५ अन्वये ७/१२ सदरी अगोदरच दाखल आहे. वरीलप्रमाणे मयतास वारस असुन याशिवाय दुसरे कोणीही वारस नाहीत करीता बाजुस दाखल केलेल्या स.नं.च्या जमिनीस वरीलप्रमाणे गावी फेरफार क्र.१७४ ने लागलेल्या वारसांव्यतिरिक्त जमनाबाई नेहरु म्हात्रे यांचे नाव दाखल केले असे नमुद करुन फेरफार क्र.१२४१ हा नोंदविण्यात आला. सदर फेरफार क्र.१२४१ च्या मंजुरीस सामनेवाले क्र.१ ते ४ यांनी हरकत घेतल्यामुळे तलाठी सजा देसाई यांनी हरकत घेतलेल्या नोंदीबाबत विवादग्रस्त नोंदवही गाव नमुना नं.६ अ अन्वये भरुन ते मा. नायब तहसिलदार(महसूल) ठाणे यांचे न्यायालयात विवादग्रस्त प्रकरण क्र.एसआर-१०१/२०१३ कामी चौकशीसाठी पाठविण्यात आलेले होते. सदर प्रकरणी सामनेवाला क्र.२ यांस नोटीस काढण्यात आलेली नव्हती. सबब सदर प्रकरणी त्यांस त्यांचे म्हणणे दाखल करता आले नाही. तहसिलदार यांनी दि.०४/४/२०१५ रोजी निकाल देवुन फेरफार क्र.१२४१ मंजुरीचा हुकुम पारीत केलेला आहे. तसेच फेरफार क्र.१३१६ अन्वये दाखल करुन घेतलेले आहे.अपिलार्थी यांना फेरफार क्र.१३१६ च्या मंजुरीस हरकत घेता आली नाही.

४.८ सदर मिळकतीमध्ये बांधकाम करुन इमारतीमधील काही सदनिका सामनेवाले क्र. २ यांनी त्रयस्त इसमास विक्री केली आहे. या सर्व बाबींच्या आधारे सामनेवाले क्र.२ यांनी एसआर-१०१/२०१३ मधील दि.०४/०४/२०१५ रोजीचा निर्णय व त्याअनुषंगाने नोंदविण्यात आलेले फेरफार क्र.१२४१ व १३१६ रद्द करण्यात यावे व सामनेवाले क्र.२ यांची नोंद करण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

५. **<u>उपरोक्त अपिल मिळकती संदर्भात दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकुन प्रकरण निर्णयासाठी बंद करण्यात आले.</u>**

अपिलार्थी व सामनेवाले यांचा युक्तीवाद, म्हणणे, सुनावणीतील युक्तीवाद व कागदपत्रे पहाता खालीलप्रमाणे निष्कर्ष दिसून येतात.

५.१ अपिलार्थी यांनी मौजे खिडकाळी, ता.जि.ठाणे येथिल मिळकतीबाबत नायब तहसिलदार(महसुल) ठाणे यांनी प्रकरण क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ दि.२६/०१२/२०१४ रोजी दिलेला निर्णय व त्याअनुषंगाने नोंदविण्यात आलेला फेरफार क्र.१२४१ व १३१६ चे विरुध्द प्रस्तुतचे अपिल या न्यायालयात दाखल केले आहे.

५.२ या अपिलातील सामनेवाले क्र.२ यांनी याच फेरफाराविरुध्द अपिलार्थी व उर्वरित सामनेवाला यांचे विरुध्द दि.१८/०३/२०१६ रोजी स्वतंत्र अपिल दाखल केले होते. त्यातील दावा मिळकत व आव्हानित आदेश व पक्षकार सारखेच असल्याने सदर अपिल या आरटीएस अपिल

क्र.१४८/२०१५ मध्ये समाविष्ठ करणेत आले व सर्व पक्षकारांचे म्हणणे विचारात घेवुन हा निर्णय घेण्यात येत आहे.

५.३ अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलाचे अनुषंगाने त्यांचे लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थी यांचा दावा मिळकतीचा हक्क सन १९६० सालचे कानुबाई म्हात्रे (अपिलार्थी यांचे पुरोगामी) यांचे लाभातील बक्षीसपत्राचे अनुषंगाने असल्याचे नमुद केले आहे. सामनेवाला यांनी सदरचे बक्षीसपत्र दिवाणी न्यायालय ठाणे येथे दिवाणी दावा क्र.६०४/२०१३ अन्वये आव्हानित केले आहे. सदर दावा न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे सामनेवाला यांच्या वारस नोंदी दावा मिळकतीस होणेसाठी नोंदविण्यात आलेले फेरफार क्र.१२४१ व १३१६ हे रद्द करण्यात यावे, अशी विनंती त्यांनी केली आहे.

५.४ सामनेवाले क्र. १.१ ते १.८ यांनी प्रस्तुत अपिलाचे कामी त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी कानुबाई व जमुनाबाई (सामनेवाले यांचे पुर्वगामी) त्या दोघींही बहीणी असून बापु ठाकुर यांच्या मुली आहेत. त्यामुळे दावा मिळकतीस बापु ठाकुर यांच्या वारस म्हणून जमुनाबाई यांचे नावाची नोंद होणे योग्य व कायदेशिर आहे. त्याअनुषंगाने जमुनाबाई नेहरु म्हात्रे यांच्या नावाची नोंद होणेसाठी व त्यांच्या वारसांची नोंद होणेसाठी नोंदविण्यात आलेली फेरफार क्र.१२४१ व १३१६ हे कायदेशिर असल्याने तहसिलदार(महसुल) ठाणे यांनी प्रकरण क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ दि.२६/०१२/२०१४ रोजी दिलेला निर्णय व त्याअनुषंगाने नोंदविण्यात आलेला फेरफार क्र.१२४१ व १३१६ हे योग्य व कायदेशिर असल्याने कायम ठेवण्यात यावे, अशी विनंती सामनेवाले यांनी केली आहे.

५.५ सामनेवाले क्र.२ यांनी प्रस्तुत अपिलाचे कामी त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी केशव सोग्या म्हात्रे व इतर यांनी दावा मिळकत ही मे. लक्ष्मी असोसिएट्स यांस दि.०४/०७/२००८ रोजीच्या दस्तऐवज क्र.टनन-२-६०३६/२००८ अन्वये नोंदणीकृत विकास करारनाम्याने दिलेली होती. सदर करारनाम्याच्या अनुषंगाने फेरफार क्र.१०९९ हा दि.२४/०४/२००९ रोजी मंडळ अधिकारी दहिसर यांनी मंजुर केलेला आहे. तद्नंतर त्यांनी सदर मिळकत ही सामनेवाले क्र.२ यांस दि.२५/११/२००९ रोजीच्या दस्त क्र. १११३५/२००९ अन्वये नोंदणीकृत विकास व करारनाम्याने दिलेली होती. मे. लक्ष्मी असोसिएट्स यांनी सदर मिळकत मे. मातेश्वरी रिअलेटर्स भागीदारी संस्था यांस दि.०३/०५/२०१० रोजीच्या दस्तऐवज क्र.टनन-२-५७३९/२०१० अन्वये नोंदणीकृत करारनाम्याने दिलेली आहे व त्यानुसार फेरफार क्र.११६० हा मंजुर केलेला आहे. त्यांच बरोबर इतरही पॅरा क्र.४.४ मध्ये नमुद केलेप्रमाणे करार व कुळमुखत्यारपत्र नोंदविलेले आहे.

५.६ सदर मिळकतीबाबत मा.ठाणे महानगरपालिका ठाणे यांचे कडुन व्ही.पी.नं.एस.११/००११/०९ टिएमसी/टीडीडी ०७०७/१२ दि.०५/११/२०१२ व व्ही.पी.नं.एस.११/००११/०९ टिएमसी/टीडीडी/१४९३/१५ दि.०७/०९/२०१५ रोजी मे. मोतेश्वरी रिअलेटर्स भागीदारी संस्था यांचे नावे सी.सी. देण्यात आलेली आहे. मा.जिल्हाधिकारी ठाणे यांनी क्र.महसुल/क-१/टे-१/एनएपी/एसआर-१३८/२००९ दि.२३/०३/१० रोजी बिनशेती परवानगी दिलेली असून ती रद्द करुन घेतलेली नाही.

५.७ दावा मिळकती या सुदाम बापु ठाकूर या मुळ मालकांची असून त्यांना दोन पत्नी मोतीबाई व सखुबाई या होत्या. मोतीबाई व सखुबाई यांनी अपिलार्थी यांचे पुर्वगामी कानुबाई यांचे लाभात सन १९६० साली बक्षीसपत्र करुन ठेवलेले आहे. सामनेवाले यांनी सदरचे बक्षीसपत्र दिवाणी

OFFICER ... SION, THANE

दावा क्र.६०४/२०१३ अन्वये सन २०१३ साली आव्हानित केले आहे. वास्तविक पहाता, दावा मिळकतीबाबत सामनेवाले क्र.२ यांचे लाभात वेगवेगळे करार झालेले आहेत. त्याबाबत पॅरा क्र.५.४ व ५.५ सविस्तर ऊहापोह करण्यात आला आहे. तसेच सामनेवाला क्र.२ यांनी दावा मिळकतीमध्ये बांधकाम करुन तेथील सदनिका काही त्रयस्त व्यक्तींना विक्री केलेल्या आहेत. ठाणे महानगरपालिका यांचेकडून सामनेवाले क्र.२ यांनी सी.सी. प्रमाणपत्र मिळवलेले आहे. त्यामुळे सामनेवाले क्र.२ यांचा दावा मिळकतील हक्क नोंदणीकृत दस्ताचे अनुषंगाने निर्माण झाला असल्याने व त्याअनुषंगाने फेरफार मंजुर झालेले असल्याने सदरचे दस्त कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्द केलेले नसताना सदर दस्तांस यास्तरावर चुकीचे ठरविता येणार नाही. त्यामुळे सामनेवाले क्र.२ यांची अपिलातील मागणी मान्य करणे न्यायोचित होणार नाही.

५.८ उपरोक्त विवेचन विचारात घेता, नायब तहसिलदार(महसुल) ठाणे यांनी प्रकरण क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ दि.२६/०१२/२०१४ रोजी दिलेला निर्णय कायदेशिर बाबींची पडताळणी करुन दिला नसल्याचे दिसून येते. ५३ वर्षापुर्वी केलेल्या बक्षीसपत्राचा आधार घेवुन, नोंदणीकृत दस्त ऐवजाद्वारे दावा मिळकतीबाबत झालेल्या फेरफार नोंदी विचारात न घेता नायब तहसिलदार(महसुल) ठाणे यांनी दिलेला निर्णय योग्य वाटत नाही. वास्तव दिवाणी दावा क्र.६०४/२०१३ चे निर्णयास अधिन राहून खालीलप्रमाणे निर्णय देण्यांत येत आहे.

## आदेश-

१. अपिलार्थी यांचे अपिल फेटाळण्यात येत आहे.
२. नायब तहसिलदार(महसुल) ठाणे यांनी प्रकरण क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ दि.२६/०१२/२०१४ रोजीचा निर्णय रद्द करण्यात येत आहे.
३. फेरफार नोंद क्र.१२४१ व १३१६ रद्द करण्यात येत आहे.
४. निर्णय सर्व संबंधितांना कळवावा.
५. खर्चाबाबत आदेश नाहीत.

TRUE COPY
Copy Applied on 12/1/17 Copying Fee 15-00
Received on 13/4 Surcharge Fee ____
Copy Delivered on 13/4 Paper Fee ____
Copied on ____ V. P. Charge ____
Prepared by ____ Total 120.00

दिनांक- ०५/ ०१/२०१७
स्थळ - ठाणे

उपविभागीय अधिकारी
ठाणे विभाग, ठाणे

प्रत :- श्रीम. सरशीबाई म्हात्रे व इतर-०७ अपिलार्थी यांचेकडे माहितीसाठी
प्रत :- श्रीम. लताबाई नामदेव पाटील व इतर ०८ सामनेवाले यांचेकडे माहितीसाठी
प्रत :- तहसिलदार ठाणे यांचेकडे माहितीसाठी

Sub. Divisional Officer

उपविभागीय अधिकारी
ठाणे विभाग, ठाणे

क्रमांक आरटीएस/अपिल-१४८/१५
उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय ठाणे.
दिनांक :०७/ ०३/२०१७

प्रति,

| | |
|---|---|
| १) श्री. केशव सोंग्या म्हात्रे (मयत)<br>१.१) श्रीम. सरशीबाई म्हात्रे<br>रा. पडले गाव, ता. जि. ठाणे<br>१.२) श्रीम. मोनिका किर्तीनंदन काळण<br>रा. एडुसा, ता. कल्याण, जि. ठाणे<br>१.३) श्रीम. निलम गुरुनाथ म्हात्रे<br>रा. वडवली गाव, ता. कल्याण, जि. ठाणे | १.४) श्री. किसन केशव म्हात्रे<br>रा. मु.पो. पडले गाव, ता. जि. ठाणे<br>२) श्री. बाळाराम सोंग्या म्हात्रे<br>३) श्रीम. सिताबाई कसो पाटील<br>४) प्रभा विश्वास माळी<br>५) श्री. मनिषा चंद्रकांत आंबोरे<br>सर्व रा. मौजे- डावले, ता. जि. ठाणे<br>...अपिलार्थी |
| विरुध्द | |
| १) जमनाबाई नेहरु म्हात्रे मयत तर्फे वारस<br>१.१) श्रीम. लताबाई नामदेव पाटील<br>१.२) श्री. सुरेश नेहरु म्हात्रे<br>१.३) श्रीम. सतीश नेहरु म्हात्रे<br>१.४) श्री. अस्मुक नेहरु म्हात्रे<br>१.५) श्री. लक्ष्मण नेहरु म्हात्रे<br>१.६) श्रीम. हौसाबाई गुलाब म्हात्रे<br>१.७) श्रीम. संगिता शशिकांत म्हात्रे<br>पत्ता : मौजे- डावले, ता. जि. ठाणे<br>...सामनेवाले | २) मेसर्स मातेश्वरी रियलटर्स तर्फे भागीदार<br>२.१ ) श्री. हिरालाल शामजी रंगानी<br>२.२) श्री. शैलेश नारायणभाई भानुशाली<br>पत्ता : मातेश्वरी अलदुरा, कल्याण-शिळ रोड, खिडकाळी ता. जि. ठाणे<br>...सामान्यपक्षकार |

**महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये न्यायनिर्णय**
**दावा मिळकत जमिन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|
| मौजे- खिडकाळी ता.जि.ठाणे | १४५/२ ड | ०-२९-३ | ६-०० | १२४१ व १३१६ |
| | १४४/२ ब | ०-३६-९ | ७-१३ | |
| | ११६/४ | ०-३४-७ | १.३१ | |
| | १०२/२ ड | ०-२८-३ | ०-८१ | |

वादी यांनी वरील दावा मिळकतीबाबत या न्यायालयात दाखल केलेले आरटीएस अपिल क्र. १४८/१५ मध्ये दिनांक ०७/०१ /२०१७ रोजी खालील प्रमाणे निर्णय देण्यात आलेला आहे.

**आदेश-**

१. अपिलार्थी यांचे अपिल फेटाळण्यात येत आहे.
२. नायब तहसिलदार(महसुल) ठाणे यांनी प्रकरण क्र.मौजे-खिडकाळी/तक्रार रजि./एसआर क्र.१०१/२०१३ दि.२६/०१२/२०१४ रोजीचा निर्णय रद्द करण्यात येत आहे.
३. फेरफार नोंद क्र.१२४१ व १३१६ रद्द करण्यात येत आहे.
४. निर्णय सर्व संबधितांना कळवावा.
५. खर्चाबाबत आदेश नाहीत.

दिनांक- ०७/०१/२०१७
स्थळ - ठाणे

**उपविभागीय अधिकारी**
**ठाणे विभाग, ठाणे**

प्रत :- श्रीम. सरशीबाई म्हात्रे व इतर ०७ अपिलार्थी यांचेकडे माहितीसाठी
प्रत :- श्रीम. लताबाई नामदेव पाटील व इतर ०८ सामनेवाले यांचेकडे माहितीसाठी
प्रत :- तहसिलदार ठाणे यांचेकडे माहितीसाठी

(वि. नि. नमुना क्र. १) (Fin. R. Form No. 1)

सर्वसा. ११३
Gen 113 n

मूळ प्रत
ORIGINAL COPY

[ अहस्तांतरणीय ]
[ NON TRANSFERABLE ]

शासनास केलेल्या प्रदानाची पावती
RECEIPT FOR PAYMENT TO GOVERNMENT

ठिकाण/Place ठाणे दिनांक/Date 13/1/2017

Received from Adv. स्वतिका मुळे

रु./Rs. 360.00 (रुपये)/Rupees तिनशे साठ मात्र

on account of RTS App No 148/2015 आदेश आदेशाची प्रत पृ. क्र. 1 ते 8 (एकूण 8)

रोखपाल वा लेखापाल
Cashier or Accountant.

( सही/Signature )
( पदनाम/Designation )

उप विभागीय अधिकारी
ठाणे विभाग ठाणे करिता

शे.का.मु.—५०,००० पु. (२०० पानी-०७-२०१४-१/पी.१४-(एस) ५५